**Government of Maharashtra**
**State Council of Educational Research & Training, Maharashtra**
Sadashiv-+Peth, Kumthekar Road,
Pune 411030
Tel. No. : (020) 24476938, 24475571
Website : www.maa.ac.in

महाराष्ट्र शासन
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे ४११०३०
दु.क्र. (०२०)२४४७६९३८, २४४७५५७१
ईमेल: curriculumdept@maa.ac.in

जा.क्र.- राशैसंप्रपम/अविवि / विषय योजना / २०२०-२१ / १८८८ दिनांक: ०७.१०.२०२०.

परिपत्रक

प्रति,

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व)

३. शिक्षण निरीक्षक (दक्षिण /उत्तर/ पश्चिम) बृहन्मुंबई

४. शिक्षण प्रमुख/ शिक्षणाधिकारी /प्रशासनाधिकारी /महानगरपालिका (सर्व)

**विषय :** इयत्ता नववी व दहावी विषय योजना व सुधारित मूल्यमापन योजना...

**संदर्भ :** १) शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१९ /प्रक्र (२४३/ १९) एस डी-४, मंत्रालय (विस्तार), मुंबई -३२ , दिनांक ०८ ऑगस्ट, २०१९.

२) राज्य मंडळ , पुणे या कार्यालयाचे परिपत्रक क्र.रा.मं./पापु/पापुई/ संशोधन/ इ. ९ वी व १० वीची सुधारित विषय योजना व मूल्यमापन योजना /४२४०, दि.१६/०८/२०१९.

या परिपत्रकान्वये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न सर्व माध्यमिक शाळा प्रमुखांना कळविण्यात येते की, इयत्ता नववी व दहावीची विषय योजना व मूल्यमापन योजनेची पुनर्रचना संदर्भिय शासन निर्णयाद्वारे करण्यात आलेली आहे. त्यानुसार २०१९-२० पासून इयत्ता नववी व दहावी करिता सुधारित विषय योजना व मूल्यमापन योजना लागू करण्यात आलेली आहे.

१. इयत्ता नववी व दहावीच्या श्रेणी विषयातील वैकल्पिक गटात संरक्षणशास्त्र या विषयाला सद्यस्थितीत एम.सी.सी. (इयत्ता ९ वी साठी ) स्काऊट गाईड, नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा, एन.सी.सी. हे विषय सुरू आहेत. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून कार्यशिक्षण, समाजसेवा, होकेशनल V१, V२ इ. व्यवसाय विषयांचे पर्याय उपलब्ध राहतील.

२. "जलसुरक्षा" हा विशेष श्रेणी विषयांमध्ये नव्याने समाविष्ट करण्यात येत असून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून हा विषय श्रेणी विषयात अनिवार्य राहील. स्व-विकास व कलारसास्वाद हा विषय संरक्षणशास्त्र विषयासोबत वैकल्पिक गटात समाविष्ट असेल.

३. इयत्ता नववी व दहावी विषय योजना व मूल्यमापन योजना याबाबतची माहिती संदर्भिय शासन निर्णयात प्रपत्र-अ मध्ये तपशीलवार देण्यात आली आहे.

संदर्भ क्र.१ शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आलेल्या विषयरचनेनुसार अंमलबजावणी सुरु असेलच.

संदर्भ क्र. २ परिपत्रकाद्वारे राज्य मंडळाने इ. ९ वी व १० वी साठी सुधारित विषय योजना व मूल्यमापन योजनाबाबत सर्व मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक शाळांना कळविण्यात आलेले आहे.

वरीलप्रमाणे सर्व सूचना पुनःश्च आपल्या अखत्यारीतील सर्व माध्यमिक विद्यालयातील मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून या परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्या www.maa.ac.in या संकेतस्थळावर हे परिपत्रक उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

(दिनकर पाटील)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद, महाराष्ट्र, पुणे- ३०

**प्रत माहितीस्तव :**

१. मा. अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई .
२. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
४. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
५. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे.
६. विशेष कार्य अधिकारी, मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. विभागीय सचिव, सर्व, विभागीय मंडळे, (महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ).